International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# आदिवासी लोककथांमधील बोलीभाषिक साधन संपत्ती

**प्रा. डॉ. दीपककुमार वळवी**

*मराठी विभाग प्रमुख, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर*

*Corresponding Author – प्रा. डॉ. दीपककुमार वळवी*

**DOI - 10.5281/zenodo.18491078**

**सार *(Abstract):***

*आदिवासी समाजात विविध लोककथा सांगितल्या जातात. त्या लोककथांमधील विविध बोलीभाषांची माहिती सदर संशोधन लेखात दिलेली आहे. या बोलीभाषा म्हणजे आपल्या राष्ट्राची भाषिक साधन संपत्ती आहे. त्या बोलीभाषा जतन करून ठेवणे ही काळाची गरज आहे. या बोली भाषांमध्ये जल-जंगल-जमीन यांचे ज्ञान आणि माहिती समाविष्ट केलेली आहे.*

## प्रस्तावना:

आदिवासी लोककथांच्या रचनाबंधातील महत्त्वाचा घटक म्हणजे लोककथेत वापरलेली बोलीभाषा होय. आदिवासी कथक लोककथेची मांडणी करताना कथनाच्या माध्यमातून बोलीभाषेच्या वेगवेगळ्या रूपांचा आधार घेऊन त्यांच्या स्वतंत्र वेगळ्या बोलीभाषेचा अविष्कार करीत असतो. भाषा ही मुळात ध्वनी चिन्हांची मांडणी असून श्रवण आणि उच्चारण या माध्यमातून अवगत केली जाते .आदिवासी जमातींचा भाषिक दृष्टीने विचार करता त्यांच्या भाषेला लिपी नाही लिपी नसली तरी मौखिक परंपरांचा आधार घेऊन आदिवासी जमाती बोलीभाषा बोलताना आढळतात. भाषाशास्त्रीय दृष्ट्या विचार करता ज्या भाषा लिखित स्वरूपाच्या नाहीत आणि ज्यांचे स्वरूप बोली आहे त्यातून खऱ्या अर्थाने भाषा शास्त्रीय अभ्यास करता येण्यासारखा आहे. विचार व्यक्त करण्याचे साधन म्हणजे भाषा होय .भाषेत हवभावाची भाषा, बोलण्याची भाषा हे प्रमुख भेद असून त्यांचा जीवनव्यवहार हावभाव आणि श्रवण या माध्यमांच्या आधाराने चालत असतो.

## विषय विवेचन:

आदिवासी लोककथांमधील भाषेचा विचार करता भाषेची उत्पत्ती समजून घेणे महत्त्वाचे वाटते. मनुष्यप्राणी प्रथम भाषा कधी शिकला किंवा त्याने प्रथम भाषा ही कशी तयार केली हे ठरविताना आपणास लहान मुले भाषा कशी शिकतात हे पाहणे तितकेच महत्त्वाचे असते. आदिवासी जमाती वन्य स्थितीत राहताना प्रथम भाषा कशी शिकतात हेही पाहणे तितकेच महत्त्वाचे असते .कारण भाषेचा उगम कशा पद्धतीने झाला याचा शोध जर आपणाला घ्यायचा असेल तर तो आदिवासी बोलीभाषांचा अभ्यास केल्यानंतर आपणाला समजते आणि याच्यातूनच भाषेची उत्पत्ती कशी झाली याचे संदर्भ मिळतात .

आदिवासी लोककथांमधून अभिव्यक्त होणारी मौखिक बोली ही मराठी भाषेचा महत्त्वाचा घटक असून त्या बोलीभाषेमध्ये मराठी, हिंदी ,इंग्रजी, गुजराती अशा वेगवेगळ्या भाषांचे संदर्भ येताना दिसतात. लिखित स्वरूपात साहित्य लेखन होत असताना परंपरागत बोली भाषेचा स्वीकार करून आदिवासी जमाती आजही आपले जीवन व्यवहार मौखिक बोलीभाषेतून आणि बोलीभाषेतील

लोककथांमधून अविष्कृत करीत आहेत हे महत्त्वाचे आहे. भाषेच्या मौखिक परंपरेचे महत्त्व विशद करताना भालचंद्र नेमाडे लिहितात मौखिकता ही भाषेच्या उत्पत्तीपासून मानवी व्यवहारात सतत चालत आलेली वैश्विक अविष्कार पद्धती असून लेखन, मुद्रण आणि आता इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञान अशा अनेक प्रभावी माध्यमांना तोंड देत ती टिकून आहे. भालचंद्र नेमाडे यांनी मौखिक परंपरेचा अभिमान बाळगून मराठी भाषेच्या उत्पत्ती विषयक मौखिकतेचे महत्व पटवून दिलेले आहे. आदिवासी लोककथांची मांडणी करणारा कथक पारंपरिक पद्धतीने चालत आलेली मानवी व्यवहाराची मौखिक बोलीचा अभिमान बाळगून आपल्या बोलीभाषेतून कथांची मांडणी करीत असतो .

आदिवासी लोककथेतील बोली भाषेचा विचार करता ती गतिमान, जिवंत, साधी, सोपी, प्रवाही आणि समृद्ध सांस्कृतिक जीवनाचे महत्त्व विशद करणारी आहे. बोलीभाषेच्या वापरातून लोककथांचा रचनाबंध स्पष्ट होताना दिसतो, त्यामुळे पारंपरिक लोककथा श्रोत्यांच्या पर्यंत पोहोचण्यास मदत होते. आदिवासी बोलीभाषेला पारंपरिक निसर्गदत्त स्वतःची लय असते आणि ती लय लोककथेला आपोआपच प्राप्त होते, त्यामुळे अशा लोककथेला बोलीभाषेच्या माध्यमातून लोकभाषेशी जवळीक साधने सोपे जाते म्हणजे लोककथक कथन करताना बोलीची लय वापरत असतो लोककथाही मौखिक कलाकृती असल्यामुळे ती दीर्घकालीन आणि चिरकालीन सांस्कृतिक व्यवहाराचे एक महत्त्वाचे सामाजिक केंद्र बनून टिकत आहे आणि टिकणार आहे .

आदिवासी कथक कथेची मांडणी करताना बोलीभाषेच्या अनुषंगाने आशय आणि अभिव्यक्तीसाठी बोलीतील शब्द, वाक्प्रचार ,उपमा, प्रतिमा ,प्रतीके, रूपके, म्हणी आणि वाक्प्रचार यांना महत्त्व देऊन तो स्वतःची भाषा निर्माण करीत असतो. यासाठी त्याला लोककथा हे माध्यम महत्त्वाचे वाटत असते .

आदिवासी बोली भाषेची समृद्ध सधनपरंपरा सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाची आहे. मौखिक परंपरेने चालत आलेल्या बोलीचा स्वीकार करून आदिवासी कथक श्रोत्यापर्यंत आपली कथा पोहोचविण्याचा प्रयत्न करीत असतो. भाषिकदृष्ट्या परंपरा जपणाऱ्या आदिवासी कथकाचे समाजातील स्थान महत्त्वाचे असते कारण त्यांच्या दृष्टीने तो ज्ञानी असतो. लिखित भाषा परंपरांचा कोणताही अनुभव नसताना केवळ श्राव्य माध्यमातून जपलेल्या समृद्ध सधन बोलीद्वारे आपल्या प्रतिभेच्या जोरावर तो जमातीतील लोकांशी एकरूप होत असतो. मागच्या पिढीकडून आलेले मौखिक संचित पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविताना त्यात भर घालून पारंपारिक बोलीला समृद्ध करण्याचा प्रयत्न करत असतो. आदिवासी कथक परंपरागत बोलीचा अभिमान बाळगत असताना परिस्थितीनुरूप प्रतिक्रिया व्यक्त करताना बोलीभाषेच्या अनेक रूपांना घेऊन अभिव्यक्त होतो.

आदिवासी लोककथेतील प्रादेशिक बोलीचा विचार करताना ती त्याच्या प्रदेशातील प्राचीन रूपे असून शब्द संपत्तीच्या दृष्टीने समृद्ध आहे. भाषेची प्राचीन रूपे पहावयाची असतील तर आदिवासी बोलीभाषा अधिक प्रमाणात मदत करू शकतात .कारण आदिवासींच्या जंगलातील बंदिस्त जीवनामुळे त्यांच्या भाषांवर इतर भाषांचा होणारा प्रभाव कमी प्रमाणात असल्याचे दिसून येते.

आदिवासी बोलीभाषक साधन संपत्तीचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा आदिवासी बोलीभाषेतील पारंपारिक पद्धतीने चालत आलेल्या त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाची जी साधन संपत्ती आहे ती त्यांच्या बोलीभाषेच्या माध्यमातून व्यक्त होते. लोककथा, नृत्य, नाट्य, गीत, संगीत, वाद्य, सांस्कृतिक परंपरा, निसर्ग

समृद्ध इतिहास, निसर्गाचा मानवी जीवनावर होणारा अनुकूल प्रतिकूल परिणाम हे सर्व संदर्भ या सधन भाषिक व्यवहाराच्या आधारे मौखिक परंपरेने समाजापर्यंत पोहोचवण्याचे काम केले जाते. लिपी नाही म्हणून शिकण्याला ही अवघड भाषा असली तरी शब्द संपत्तीने परिपूर्ण अशी ती बोली आहे. सभोवतालच्या सामाजिक व्यवहाराचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा समाज माध्यमांचे बदलते स्वरूप पारंपारिक पद्धतीने चालत आलेली बोलीवर होणारे जे अतिक्रमण आहे ते अतिक्रमण थोपवण्याच्या दृष्टिकोनातून आदिवासी जमाती आपल्या बोलीभाषेची समृद्धता आजही टिकून ठेवत आहेत हा भाषिक व्यवहार सामाजिक व्यवहाराची महत्त्वाची साधन संपत्ती म्हणून आपणाला अभिमानास्पद आहे.

**संदर्भ:**

1. मधुकर वाकोडे: मौखिकता आणि लोकसाहित्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प्रथम आवृत्ती २००१